.. kuNaachyaa khaa.ndyaavara ..

# ॥ कुणाच्या खांद्यावर ॥

कुणाच्या खांद्यावर कुणाचें ओझें ?

कुठें उतरावें? कशासाठीं तंबू ठोकून ?
कोण मेलें कुणासाठीं रक्त ओकून ?
या सगळ्याचा हिशेब ठेवायचा कुणीं ?
मनांतल्या मनांत कुजुन जगतात कुणीं
गुलाब राहतील तरीही ताजे । कुणाच्या ...

इथले सगळे दिवे विझून जातात
अंधारांत वृक्ष गोठून झडत राहतात
कुणी करतात प्रीत, कुणी करतात पूजा,
कुणी खोकत खोकत जीवनाशीं पैजा
मारून म्हणतातः आम्ही राजे ! कुणाच्या ..

अंत झाला असता आधी जन्म एक व्याधी
वेदनांची गाणीं म्हणजे पोकळ समाधी
कुणी देतो एक हळी, त्याचाच पडतो बळी
हारासारखे हौतात्म्य त्याच्या येतें गळीं
त्याचे त्याला माहित पंजे । कुणाच्या ..

कवि आरती प्रभू
संगीत भास्कर चंदावरकर
गायक रविंद्र साठे

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999